# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## मा.क्रिडा समिती

## कार्यपत्रिका क्रमांक :- २

## सभावृत्तांत

दिनांक :- २१/०७/२०१० वेळ :- दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रिडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक २१/७/२०१० रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.राजेश ऊर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले - सभापती
२) मा.तापकीर मच्छिंद्र भाऊसाहेब - उपसभापती
३) मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
४) मा.अजित दामोदर गव्हाणे
५) मा.ननावरे जितेंद्र बाबासाहेब
६) मा.खोमणे लता हनुमंत

याशिवाय मा.गायकवाड - सहा.आयुक्त, मा.चाकणकर - उपनगरसचिव मा.पानसरे - क्रिडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------------

<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-</u>

विषय क्रमांक :-१) जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१० - ११ अनुषंगाने क्रीडा साहित्य खरेदी करणेबाबत..

विषय क्रमांक :- २) मनपा च्या वतीने उदयोन्मुख क्रिकेट पंचासाठी कार्यशाळा आयोजित करणेबाबत..मा.जितेंद्र ननावरे,मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- ३) मनपा च्या वतीने से.नं.२५ प्राधिकरण येथे नव्याने सुरु होत असलेले २ लॉन टेनिस कोर्ट भाडेतत्वावर चालविण्यास देणेबाबत..मा.प्रभाकर वाघेरे,मा.मच्छिंद्र तापकीर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- ४) मनपाच्या व्यायामशाळा करीता मध्यवर्ती भांडार विभागाकडुन ई - निविदा प्रक्रीया करुन व्यायाम साहित्य खरेदी करणेबाबत..मा.प्रभाकर वाघेरे,मा.मच्छिंद्र तापकीर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- ५) मनपाची पिंपरी नगर बॉक्सिंग हॉल शेजारील व्यायामशाळा ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर चालविणेस देणेबाबत.. मा.प्रभाकर वाघेरे,मा.मच्छिंद्र तापकीर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- ६) पिं.चिं.मनपा परिसरात योग्य ठिकाणी खेळाडु निवासस्थान बांधणेबाबत..मा.प्रभाकर वाघेरे,मा.मच्छिंद्र तापकीर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- ७) मनपाचे मेजर ध्यानचंद हॉकी पॉलिग्रास स्टेडियम येथील गॅलरीस "बाबु लिमण व जो फिलीप्स" असे नाव देणेबाबत.. ..मा.प्रभाकर वाघेरे,मा.मच्छिंद्र तापकीर यांचा प्रस्ताव..

--------------

अ) दि. २/०६/२०१०, ३/०६/२०१० व १६/०६/२०१०रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १६) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दि.६/०७/२०१० रोजी झालेल्या विशेष सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले -</u>

ठराव क्रमांक :- ४ विषय क्रमांक :- १
दिनांक :- २१/०७/२०१० विभाग :- क्रिडा
सुचक :- मा. लता खोमणे अनुमोदक :-मा.अजित गव्हाणे
संदर्भ :- मा.अतिरीक्त आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/५/कावि/२५३/२०१० दि.२१/७/२०१०

मा.अतिरीक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१० - ११ अनुषंगाने क्रीडा साहित्य खरेदीकामी र.रु.८,३३,३४५/- इतका खर्च येणार असल्याने मध्यवर्ती भांडार विभागाकडुन ई - निविदा नोटीसची कार्यवाही करणेस व क्रीडा साहित्य खरेदीस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक :- ५ विषय क्रमांक :- २
दिनांक :- २१/०७/२०१०
सुचक :- मा. जितेंद्र ननावरे अनुमोदक :-मा.प्रभाकर वाघेरे
संदर्भ :- मा.जितेंद्र ननावरे, मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने, पुणे जिल्हा क्रिकेट असोसिएशन, यांच्या मान्यतेने व जिल्हा क्रीडा परिषद, पुणे यांच्या सहकार्याने माहे ऑगस्ट २०१० मध्ये कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम येथे, उदयोन्मुख क्रिकेट पंचासाठी कार्यशाळा आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु. ३०,०००/- चे खर्चास व क्रिकेट पंच प्रशिक्षण फी र.रु.२००/- निश्चीत करण्यास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक - ६ विषय क्रमांक :- ३
दिनांक- २१/७/२०१०
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक- मा.मच्छिंद्र तापकीर
संदर्भ :- मा.प्रभाकर वाघेरे, मा.मच्छिंद्र तापकीर यांचा प्रस्ताव..

म.न.पा.च्या वतीने से.नं.२५, प्रधिकरण येथे नव्याने तयार करण्यात आलेले २ लॉनटेनिस कोर्ट म.न.पा. नियमानुसार भाडे आकारून, सदभावना प्रतिष्ठान, आकुर्डी या संस्थेस ११ महिने भाडेकराराने चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक - ७ विषय क्रमांक :- ४
दिनांक - २१/७/२०१०
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक- मा.मच्छिंद्र तापकीर
संदर्भ :- मा.प्रभाकर वाघेरे, मा.मच्छिंद्र तापकीर यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड म.न.पा.च्या एकुण ७४ व्यायामशाळा असुन त्यापैकी ३७ व्यायामशाळा म.न.पा. स्वत: चालवित असुन ३७ व्यायामशाळा म.न.पा. परिसरातील सार्व.संस्था/मंडळे यांना ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास दिलेल्या आहेत. म.न.पा.च्या सर्व व्यायामशाळांकरीता सन्माननीय नगरसदस्य, नागरीक यांचेकडुन नव्याने व्यायामसाहित्य खरेदी करून मिळणेबाबत मागण्या आलेल्या आहेत. म.न.पा. च्या व्यायामशाळांकरीता सन २०१०-११ चे उपलब्ध तरतुदीनुसार व्यायामशाळा साहित्य खरेदीकामी मध्यवर्ती भांडार विभागाकडून दोन वर्षाकरीता ई-निविदा प्रक्रिया करणेस व याकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक - ८ विषय क्रमांक :- ५
दिनांक - २१/७/२०१०
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक- मा.मच्छिंद्र तापकीर
संदर्भ :- मा.प्रभाकर वाघेरे, मा.मच्छिंद्र तापकीर यांचा प्रस्ताव..

म.न.पा.ची पिंपरीनगर बॉक्सिग हॉल शेजारील व्यायामशाळा ही पिंपरी चिंचवड युवा प्रतिष्ठान या संस्थेस ११ महिने कराराने द.म.सेवाशुल्क र.रू.२०००/- देऊन कराराने चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक - ९ विषय क्रमांक :- ६
दिनांक - २१/७/२०१०
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक- मा.मच्छिंद्र तापकीर
संदर्भ :- मा.प्रभाकर वाघेरे, मा.मच्छिंद्र तापकीर यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड म.न.पा. परिसरात दरवर्षी महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जातात. सदर स्पर्धेसाठी बाहेरून येणाऱ्या खेळाडुंची निवास व्यवस्था होण्यासाठी म.न.पा.च्या वतीने कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम नेहरूनगर, मदनलाल धिंग्रा मैदान, इंद्रायणीनगर क्रीडा संकुल, हॉकी पॉलिग्रास स्टेडियम, नेहरूनगर येथे नव्याने “खेळाडू निवास व्यवस्था” बांधणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक - १०　　　　　　　　　　　विषय क्रमांक :- ७
दिनांक - २१/७/२०१०
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे　　　　　　　　　अनुमोदक- मा.मच्छिंद्र तापकीर
संदर्भ :- मा.प्रभाकर वाघेरे, मा.मच्छिंद्र तापकीर यांचा प्रस्ताव..

म.न.पा.चे मेजर ध्यानचंद हॉकी पॉलिग्रास स्टेडियम येथील गॅलरीस “बाबु लिमण व जो फिलीप्स” असे नाव देणेत यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

[ राजेश ऊर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले]
सभापती
क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/९/कावि/१००८/२०१०
दिनांक :- २६/७/२०१०

उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रत :- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.